महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा)

जनसंपर्क विभाग

==============================================================================

जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/ ११०८ दि. ०३/०८/२०२०

**प्रसिद्धी पत्रक**

# साथरोगांवर उपचारासाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी कायमस्वरूपी रुग्णालये उभारणार - मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे

म्हाडा व मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने भाईंदर पूर्व येथे उभारलेल्या ३७१ बेडच्या दोन समर्पित कोविड आरोग्य केंद्रांचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते लोकार्पण

**मुंबई, दि. ३ ऑगस्ट, २०२० :-** नागरिकांचे सुदृढ आरोग्य हा महाराष्ट्र शासनाच्या दृष्टीने प्राधान्याचा विषय असून महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिक सुदृढ, निरोगी राहावा यासाठी राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. कोरोनासारख्या साथरोग आजारांवर उपचारासाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी कायमस्वरूपी रुग्णालये उभारण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांनी आज केले.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) व मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने भाईंदर पूर्व (जि. ठाणे) येथे कोरोनाबाधित रुग्णांवरील उपचारासाठी उभारलेल्या दोन स्वतंत्र अद्ययावत समर्पित कोविड आरोग्य केंद्रांचे लोकार्पण माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणाली (व्हिडिओ कॉन्फरन्स) द्वारे करण्यात आले. यावेळी श्री. ठाकरे बोलत होते.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले की, कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी यंत्रणांमधील समन्वय अत्यंत महत्त्वाचा आहे. क्वारंटाईन सुविधांचे नेटके व्यवस्थापन करण्यासोबतच ट्रेसिंग, ट्रॅकींग आणि टेस्टींगही मोठ्या प्रमाणात कराव्यात. सर्व यंत्रणांनी मृत्यूदर रोखण्यासाठी अधिक प्रयत्न करावेत. कोरोना रुग्णांवर उपचारादरम्यान अतिशय काळजीपूर्वक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. योग्य औषधोपचाराबरोबरच रुग्णाची योग्य काळजी व रुग्णसेवा अत्यंत महत्त्वाची असुन यामध्ये हयगय अथवा दुर्लक्ष होता कामा नये. या बाबीवरही स्थानिक प्रशासनाने लक्ष केंद्रित केल्यास मृत्यूदर कमी करणे शक्य होईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा नगरविकास मंत्री श्री. एकनाथ शिंदे म्हणाले की, मिरा-भाईंदर महानगरपालिका परिसरातील कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी व कोरोना बाधित रुग्णांना तातडीने उपचार मिळण्यासाठी या आरोग्य केंद्रांची मदत होणार आहे.

P.T.O

गृहनिर्माण मंत्री श्री. जितेंद्र आव्हाड म्हणाले की, मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या सूचनेनुसार भाईंदर येथे व कल्याण डोंबिवली येथे तातडीने समर्पित कोविड आरोग्य केंद्रांच्या उभारण्याचे काम सुरू करण्याचे निर्देश म्हाडाला दिले. कोरोना बाधित रुग्णांचे प्राण वाचवणे व त्यांना तातडीने औषधोपचार मिळावेत, या उद्देशाने या आरोग्य केंद्रांची उभारणी करण्यात आली असून या उभारणीत 'म्हाडा'ने दिलेले योगदान मोलाचे असून निश्चितच कौतुकास्पद आहे.

भाईंदर पूर्व (जि. ठाणे) येथील स्व. प्रमोद महाजन सभागृह, गोपाळ पाटील रोड येथे अद्ययावत समर्पित कोविड आरोग्य केंद्राची (Dedicated Covid Health Center) उभारणी करण्यात आली आहे. ७ हजार ९८० चौरस फूट जागेमध्ये उभारलेल्या या आरोग्य केंद्रात कोरोनाबाधित रुग्णांवर उपचारासाठी एकूण २०६ बेड आहेत. हे सर्व बेड ऑक्सिजन सुविधा असलेले आहेत. या केंद्रात नोंदणी, बाह्यरुग्ण व अतिदक्षता विभाग तयार करण्यात आले असून अतिदक्षता विभागात दोन व्हेंटिलेटर्सची व्यवस्था करण्यात आली आहे. या आरोग्य केंद्राच्या ठिकाणी सहा किलोलिटर साठवण क्षमता असणारी ऑक्सीजन टाकी बसवण्यात आली आहे.

भाईंदर पूर्व (जि. ठाणे) येथील स्व. मीनाताई ठाकरे मंडई येथे उभारण्यात आलेल्या दुसऱ्या समर्पित कोविड आरोग्य केंद्रात (DCHC) कोरोनाबाधित रुग्णांवर उपचारासाठी एकूण १६५ बेडची व्यवस्था करण्यात आली आहे. हे सर्व बेड ऑक्सिजन सुविधा असलेले आहेत. याही आरोग्य केंद्राच्या ठिकाणी सहा किलोलिटर साठवण क्षमतेची ऑक्सिजन टाकी उभारण्यात आली आहे.

या दोन्ही आरोग्य केंद्रांमध्ये रुग्णांवर उपचारासाठी वैद्यकीय तज्ञ व कर्मचारी २४ तास कार्यरत राहणार आहेत. तसेच विविध चाचण्यांसाठी पॅथॉलॉजी लॅबही उभारण्यात आली आहे. केंद्रात रुग्णांसाठी खानपानाची सुविधा असणार आहे. तसेच रुग्णांसाठी स्वतंत्र शौचालय व स्नानगृह उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

यावेळी खासदार श्री. राजन विचारे, आमदार श्री. प्रताप सरनाईक, आमदार श्रीमती गीता जैन, आमदार श्री. रवींद्र फाटक, आमदार श्री. रवींद्र चव्हाण, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती ज्योत्स्ना हसनाळे, म्हाडाचे उपाध्यक्ष श्री. मिलिंद म्हैसकर, आयुक्त श्री. विजय राठोड आदी उपस्थित होते.

वैशाली गडपाले,
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा.

================================


महाराष्ट्र शासन
मुख्यमंत्री
OPPO F11 Pro






मिरा भाईंदर महानगरपालिका
समर्पित कोविड आरोग्य केंद्र
Dedicated COVID Health Center
म्हाडा
MHADA
SWARGIYA MEENATAI THACKERAY SABHAGRUHA
Reservation No. 231, Mira Road (E), Dist. Thane


FIRST FLOOR
01 To 06
FIRST FLOOR
13 To 07


INOXCVA
MHADA-MBMC
COVID-19 HOSPITAL
MEDICAL OXYGEN


मिरा भाईंदर महानगरपालिका
समर्पित कोविड आरोग्य केंद्र
Dedicated COVID Health Center
म्हाडा
MHADA
स्व. प्रमोद महाजन सभागृह
आरक्षण क्र. २१८, गोपाळ पाटील रोड, भाईंदर (पूर्व), जि. ठाणे
SWARGIYA PRAMOD MAHAJAN SABHAGRUHA
Reservation No. 218, Gopal Patil Road, Bhayander (E), Dist. Thane
KEEP SILENCE
NO SMOKING


GROUND FLOOR
01


GROUND FLOOR
02
GROUND FLOOR
03

